EX/ICD/2019-20/988
dt. 23/09/19

# मुंबई विद्यापीठ

दुरध्वनी क्र – ०२२ २६५४ ३०३५ / २६५३ ०२८३
ईमेल - cap.exam@mu.ac.in

केंद्रिय मुल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई– ४०० ०९८.

क्र. परीक्षा/कें.मु.कें./ ९८८ /२०१९ दिनांक : 23 सप्टेंबर, २०१९

**परिपत्रक** :-

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचलित कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापन, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठाच्या दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक आणि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक/संचालक यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, विद्यापीठ परिपत्रक क्र. DBOEE/आय.सी.एफ/२०१८–१९/४७७ दिनांक – २६ फेब्रुवारी, २०१९ अन्वये संलग्नता (Affiliation), नियमितता (Continuation), नैसर्गिक वाढ (Natural Growth), प्रवेश क्षमता (Intake Capicity) , पदव्युत्तर केंद्र/ संशोधन केंद्र (PG Center/ Research Center) इ. बाबत विद्यापीठास प्रस्ताव सादर करताना महाविद्यालयाने प्रथम सत्र २०१९ च्या परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थी संख्येच्या १.५ पट उत्तरपुस्तिका तपासल्याचे प्रमाणपत्र, उपकुलसचिव, केंद्रिय मुल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग यांच्याकडून घेणे बंधनकारक होते.

तरी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम (८९) अन्वये निकाल वेळेत घोषित करण्यासाठी व्दितीय सत्र २०१९ आणि प्रथम सत्र २०२० साठी महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थी संख्येच्या १.५ पट उत्तरपुस्तिका तपासल्याचे प्रमाणपत्र घेणे सर्व महाविद्यायांना बंधनकारक राहील. याची नोंद सर्व महाविद्यालयांनी घ्यावी.

डॉ. विनोद पाटील.
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

Scanned by CamScanner

EX/ICD/2019-20/989
dt 23/09/19

# मुंबई विद्यापीठ

दुरध्वनी क्र – ०२२ २६५४ ३०३५ / २६५३ ०२८३
ईमेल - cap.exam@mu.ac.in

केंद्रिय मुल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई– ४०० ०९८.

क्र. परीक्षा/कें.मु.कें./ ९८९ /२०१९ दिनांक : 23 सप्टेंबर, २०१९

**परिपत्रक** :-

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचलित कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापन, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठाच्या दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक आणि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक/संचालक यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, परीक्षा पद्धती व निकाल वेळेत लागण्याच्या दृष्टीने विद्यापीठामार्फत परीक्षा पद्धतीमध्ये वेळोवेळी बदल करण्यात येत आहे. त्याचाच भाग म्हणून व्दितीय सत्र २०१९ पासून परीक्षा केंद्रावरुन विद्यार्थाच्या उपस्थितीच्या नोंदीबाबत महाविद्यालयांनी MKCL च्या http://www.mum.digitaluniversity.ac/ या संकेतस्थळावरुन विद्यार्थ्यांच्या परिक्षाकेंद्रावरील उपस्थितीचा तक्ता (Attendance Report) २ प्रतींमध्ये छपाई करुन (प्रिंट करुन) विद्यार्थ्यांच्या हजेरीअंती एक प्रत महाविद्यालयात जतन करुन ठेवावी व दुसरी प्रत विद्यापीठात उत्तरपुस्तिके सोबत पाठवावी. परंतु एखादया परीक्षेबाबत किंवा एखादया विषयाबाबत उपरोक्त MKCL च्या संकेतस्थळावर Attendance Report उपलब्ध न झाल्यास विद्यापीठामार्फत परीक्षेपूर्वी नव्याने पुरविण्यात येणा–या Supervisor Report Cum Attendance Report चा वापर करण्यात यावा व त्याची एक प्रत महाविद्यालयात जतन करण्यात यावी व दुसरी विद्यापीठाची प्रत उत्तरपुस्तिकेसोबत विद्यापीठात पाठविण्यात यावी.

तसेच महाविद्यालयांना असेही सूचित करण्यात येते की http://uom.examtrac.in या संकेतस्थळावर परीक्षा केंद्रावरील विद्यार्थ्यांच्या हजेरीबाबत रोजच्या रोज नोंद करुन Packing Slip जनरेट करुन उत्तरपुस्तिका गठ्ठयावर लावणे बंधनकारक आहे. सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पुन्हा एकदा विनंती करण्यात येते की महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम (८९) अन्वये विद्यार्थ्यांचे निकाल वेळेत घोषित करण्यासाठी उपरोक्त बाबींचे पालन काटेकोरपणे करावे.

डॉ. विनोद पाटील.
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

Scanned by CamScanner